**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३३/२०१८-१९/ 218 दिनांक: २६.०९.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. ३३(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री पुरुषोत्तम मयाराम जाखोटीया ,<br>७/१३२ नारायण पेठ, इचलकरंजी<br>ता. हातकणंगले जि.कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय इचलकरंजी | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग ग्रामिण इचलकरंजी | |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.बी. बारसिंग, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

20/9/2018

तक्रारदार श्री पुरुषोत्तम मयाराम जाखोटीया गट क्र. ८४ मौजे तारदाळ ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी सदर गा-हाणे अपिल, त्यांना शेती पंप वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी दिनांक ११.०७.२०१८ रोजी दाखल केले आहे.

**<u>गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.</u>**

तक्रारदार यांचे म्हणणे असे की, त्यांनी शेतीसाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज दिनांक १८.०७.२०१६ रोजी वि.प. यांचेकडे सादर करुन नंतर आवश्यक ती रक्कम दिनांक २५.११.२०१६ रोजी भरणा केली. परंतु त्यांना वीज जोडणी अद्यापपर्यन्त मिळाली नाही .म्हणून त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनांक १७.०५.२०१८ च्या आदेशाने ग्राहकाची त्वरीत विज जोडणीची मागणी फेटाळण्यात येत आहे. असा निर्णय दिला. त्याने समाधान झाले नसल्यामुळे या मंचाकडे प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

**<u>वि. प. यांची भूमिका.</u>**

तक्रारदार यांनी वरील प्रमाणे दि. २५.११.२०१६ रोजी रु.२२२८/- पावती क्र. ४३६०४०९, भरणा केली हे वि.प. यांना मान्य आहे.०.१८ कि.मी. उच्च दाब वाहिनी, ०.३ कि.मी. लघु दाब वाहिनी व १० के.व्ही.ए. चे एक रोहित्र आवश्यक आहे. सदर अर्जदारास इन्फ्रा स्ट्रक्चर लागत असलेमुळे तक्रारदाराचे नाव इचलकरंजी ग्रामिण उपविभागीय कार्यालयाच्या प्रतिक्षा यादीत नोंद केले आहे.नियमानुसार त्यांना वीज जोडणी देणेत येत आहे.

उपविभाग इचलकरंजी ग्रामिण अतंर्गत असणारी शेतीसाठी वीज पुरवठा देणे आवश्यक असणारी विद्युत संच उभारणीची कामे ही प्रतिक्षा यादी मधील सन-२०१६-१७ च्या यादीमध्ये सदर ग्राहकाचे नाव ५१ व्या क्रमांकास आहे.

या प्रकरणाची सुनावणी दिनांक २६.०९.२०१८ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदारा तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री मुकुंद माळी हजर होते.तर वि.प. तर्फे सहाय्यक अभियंता उपविभाग इचलकरंजी ग्रामिण श्री. नितीन दु. वालावकर, हे हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?तसेच मागणी केलेली नुकसान भरपाई देणे योग्य होईल काय?

उत्तर:- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर:- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

## कारणमिमांसा

नविन वीज जोडणी लवकरात लवकर अशी विनंती तक्रारदार यांनी मंचासमोर केली आहे. त्यांनी वि.प.कडे रक्कम भरल्यानंतर त्यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळालेली नाही.ही बाब वि.प. कंपनीने मान्य केलेली आहे. विलंबाबाबत दिलेल्या कारणाचा हया कामी विचार करता येत नाही कारण ती कारणे, २०१४ च्या विनियम कलम ११.१ च्या बाहेरची आहेत. तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहेत. तक्रारदार यांची नावे प्रतिक्षायादीत विशिष्ट क्रमांकास नोंद आहेत. याबाबत फारसा विचार करता येणार नाही.

कृतीमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यात विलंब झाल्यास भरपाई देण्याची तरतूदही विद्युत नियामक आयोगाने केली आहे. त्यामुळे "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" तत्वाचा उपयोग वि.प. यांना करता येत नाही.

या केसमध्ये तक्रारदार यांनी त्वरीत विज पुरवठा न मिळाल्याने कृती मानकानुसार नुकसान भरपाईची मागणी जरी स्पष्टपणे केलेली नसली तरी ती देण्यात यावी असे या मंचाचे मत आहे. कारण या मंचासमोर दाखल केलेल्या अर्जामध्ये तक्रारदाराने विज पुरवठा लवकर न मिळाल्याने त्याचे नुकसान झालेले आहे असे म्हटले आहे. त्यावरुन असे स्पष्ट होते की, तक्रारदाराची नुकसान भरपाईची मागणी ही गर्भित (Implied) आहे स्वरुपाची आहे. तक्रारदार हा ग्रामिण भागातून आलेला दिसत आहे. त्याच्या तर्फे कोणीही कायदेतज्ञ हजर झालेला नाही किंवा कोणत्याही कायदेतज्ञाकडून तक्रारादाराने अर्ज लिहून घेतलेला दिसत नाही. त्यामुळे कृती मानकानुसार झालेल्या विलंबाकरिता जरी तक्रारदाराने स्पष्टपणे नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही. तरी तशी नुकसान भरपाई तक्रारदारास देण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही. कारण कृती मानकानुसार झालेल्या प्रत्येक विलंबाकरिता नुकसान भरपाई देणे हे विज वितरण कंपनीवर बंधनकारक (Mandatory) आहे. सबब तक्रारदाराला झालेल्या विलंबाकरिता नुकसान भरपाई देणे रास्त व योग्य राहिल असे या मंचास वाटते. सबब आम्ही खालील आदेश पारित करित आहोत.

## आदेश

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेतीसाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. २६.१०.२०१८ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) तसेच विरुध्द पक्षकाराने दिनांक १८.१०.२०१६ पासून हा अर्ज दाखल तारेखेपर्यन्त म्हणजे दिनांक ११.०७.२०१८ पर्यन्त झालेल्या ८८ आठवडयाच्या विलंबा करीता कृती मानके परिशिष्ट "अ" विद्युत पुरवठा( तात्पुरत्या पुरवठयासह) सुरु करणे मधील अ.क्र. ३ नुसार विलंबाच्या प्रत्येक आठवडयाकरता रु.१००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.८,८००/- फक्त भरपाई घ्यावी.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

26/9/18     26/9/2018

( पी.एस. पुजारी) ग्राहक सदस्य | (एन.बी. बार्सिंग) सदस्य सचिव | (ए.व्ही. देशपांडे) अध्यक्ष

वरील आदेशाबाबत माझे स्वतंत्र मत देत आहे.

कार्यकारी अभियंता
सदस्य – सचिव
म.रा.वि.वि.कंपनी लि.
ग्राहक तक्रार निवारण मंच
कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

मी एन.बी. बारसिंग सदस्य,सचिव वरील निर्णयाशी मी सहमत नाही. माझा स्वतंत्र न्याय निर्णय देत आहे. तो या निकालाचा भाग समजण्यात यावा. **(वेगळे मत देण्यात आलेले आहे)**

या प्रकरणाची सुनावणी दिनांक २६.०९.२०१८ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदारा तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री मुकुंद माळी हजर होते.तर वि.प. तर्फे सहाय्यक अभियंता उपविभाग इचलकरंजी ग्रामिण श्री. नितीन दु. वालावकर, हे हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय, तक्रारदार यांनी त्यांच्या मागणीप्रमाणे शेतीसाठी नवीन वीज जोडणी वि.प. यांनी दिनांक २६.१०.२०१८ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा.

वरील आदेशातील मुद्दा क्रमांक १ शी मी सहमत आहे.

परंतु तक्रारदर यांनी विलंबाबाबत त्यांच्या अर्जातील परिशिष्ट "अ" मध्ये नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही. सबब त्यामुळे तक्रारदार यांना भरपाई देणेबाबतची वरील आदेशातील मुद्दा क्रमांक २ या मताशी मी सहमत नाही

**दिनांक : २६.०९.२०१८**

**( एन.बी. बारसिंग)**
**सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर**

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण